ISSN 2231-1629 Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# स्वच्छ भारत अभियानात सोशल मीडियाची भूमिका

**युवराज तेजराव वाघ**
*संशोधक विद्यार्थी*
*डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

***सारांश :-***
*स्वच्छ भारत अभियान हे ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोचून त्यांना या अभियानात सहभागी करून घेण्याचं महत्त्वाचं काम समाज माध्यमांनी केलं आहे. समाज माध्यमांच्या सहकार्यामुळेच स्वच्छ भारत अभियानाच्या कामाला गती मिळाली आहे. नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव जागृती निर्माण करून स्वच्छतेचे महत्व लोकांना समजलं, त्यामुळे हे अभियान सरकारी योजना म्हणुन न राहता ही एक लोक चळवळ म्हणून देशामध्ये स्वच्छ भारत अभियान राबविल्या जात आहे. यामध्ये समाज माध्यमांचा वाटा महत्त्वाचा आहे.*

**प्रस्तावना :-**
आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शास्त्रज्ञांनी विविध क्षेत्रात शोध लावून जगाला आश्चर्यचकित केले आहेत. यंत्रयुगाच्या अविष्कारातून निर्माण झालेल्या तंत्रज्ञानाने मानवी समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेऊन ठेवण्याचं काम केलं आहे. दुसरीकडे मात्र अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलं आहे. देशात अस्वच्छतेमुळे रोगराईत वाढ होत होवुन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलं आहे आपल्या घराची... परिसराची स्वच्छता नियमित करून समृद्ध आणि निरोगी राष्ट्र निर्माण करण्यासाठी सर्वांनी स्वच्छतेकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. स्वच्छता कार्यक्रमात लोकांना सहभागी करून ही लोकचळवळ करण्यासाठी सोशल मीडियाची भूमिका ही महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

**स्वच्छ भारत अभियानाचे उद्देश**
1. स्वच्छतेच्या कार्यपद्धतीचे पालन करणे.
2. स्थानिक पातळीवरच कचऱ्याची विल्हेवाट लावून व्यवस्थापन करणे.
3. नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या कमी करणे.
4. स्वच्छतेविषयी समाज माध्यमांच्या अनुकूल आणि प्रतिकूल परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन आराखडा :-**
प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड केलेली आहे. तथ्य सामग्रीच्या संकलनासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शोध पत्रिका, नियतकालिके, वृत्तपत्रे, आणि प्रकाशित व अप्रकाशित साहित्य व इंटरनेट वेबसाईट चा आधार घेण्यात आला आहे.

**भारतात स्वच्छता मोहीम :-**
“स्वतंत्रपेक्षाही स्वच्छता” ही महत्वाची आहे.असं नेहमी राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणायचे. त्यांनी स्वच्छ आणि निरोगी भारताची संकल्पना मांडली. भारतात 1954 ला पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ग्रामीण भागासाठी स्वच्छता कार्यक्रम सुरू करण्यात आला. 1981 च्या जनगणनेनुसार ग्रामीण भारतात स्वच्छतेचे प्रमाण केवळ 1% इतकं होतं त्यामुळे 1981 ते 1990 च्या कालावधीत ग्रामीण स्वच्छतेवर भर देण्यात आला. भारत सरकारने 1986 ला केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (सीआरएसपी) सुरू केले. त्यांचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचवणे हा होता. 1999 ला भारत सरकारने ग्रामीण स्वच्छता आणि संपूर्ण स्वच्छतेसाठी आयोगाची स्थापना केली. 2012 मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांनी या योजनेला “निर्मल भारत अभियान “असं नाव दिलं...

**स्वच्छ भारत अभियानाची संकल्पना :-**
घर स्वच्छ राहिले तर गाव स्वच्छ राहील.... गाव स्वच्छ राहिले तर शहर स्वच्छ राहील.... शहर स्वच्छ राहिले तर राज्य स्वच्छ राहील.... आणि राज्य स्वच्छ राहिले तर पर्यायाने देशी स्वच्छ राहील... घर परिसर आणि शहरात स्वच्छता नांदली तर नागरिकांचे आरोग्य सुदृढ होईल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वच्छ भारत अभियानाची योजना आखली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचित्यसाधून 2 ऑक्टोंबर 2014 पासून संपूर्ण देशामध्ये व्यापक प्रमाणात स्वच्छ भारत अभियान राबविण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागातील लोकांचा कल हा उघड्यावर शौचालयाला जाण्याचा असतो. त्यामुळे परिसरामध्ये दुर्गंधी पसरते.

त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतो हे लक्षात घेवुन घर तेथे शौचालय...ही संकल्पना ग्रामीण भागामध्ये राबविण्यात आली.2019 पर्यंत भारतातील सर्वगावे हे हागणदारी मुक्त करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. हे उद्दिष्ट पूर्णतः साध्य झाले नसले तरी त्यांच्या आकडेवारीवरून मात्र शौचायल वापरण्याच्या संख्येत वाढ झाली आहे. घरोघरी शौचालय बांधण्यात आले आहे. त्याचा उपयोग नागरिक घेऊ लागले आहेत.

**राज्यातील स्वच्छता या संदर्भात माहिती देणारा तक्ता :-**
सन 2017-18 च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार राज्यातील शौचालय वापराची स्थिती

| एकूण कुटुंब संख्या | शौचालय वापर असलेली कुटुंबे | शौचालये न वापर करणारे कुटुंबे |
|---|---|---|
| 11153486 | 10362744 | 790742 |

**हागणदारी मुक्त ग्रामपंचायत स्थिती**

| एकूण ग्रामपंचायत | हागणदारी मुक्त ग्रामपंचायत | हागणदारी मुक्त होणे बाकी असलेल्या ग्रामपंचायत |
|---|---|---|
| 40519 | 30676 | 9841 |

**स्वच्छ भारत अभियानात माध्यमांचे योगदान :-**
घरोघरी शौचालय बांधून त्याचा नियमित वापर करावा या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यम आणि समाज माध्यमांचा उपयोग स्वच्छ भारत अभियानाच्या जनजागृतीसाठी केला. दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या माध्यमातून "मन की बात" या कार्यक्रमातून त्यांनी देशातील नागरिकांशी संवाद साधला. नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिलं. शिवाय स्वच्छतेच्या कामात पुढाकार घेणाऱ्या नागरिकांचा गौरव ते करू लागले. त्याची सर्वच माध्यमांनी दखल घेतली. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानात काम करणाऱ्या नागरिकांचा उत्साह वाढला. शिवाय अस्वच्छते विषय बातम्या प्रसारित करून माध्यमानी संबंधित यंत्रणेचं लक्ष वेधलं. देशात स्वच्छते विषयी सुरू असलेल्या या अभियानाला समाज माध्यमांनी मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देऊन समाजात जनजागृती करण्याचं काम ही केलं. भारतीय व्यक्तिमत्त्वावर समाज माध्यमांचा प्रभाव हा मोठ्या प्रमाणावर आहे. सामाजिक चळवळीच्या क्षेत्रात डिजिटल कृतिशीलतेने प्रवेश केला आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात "टेक्नॉलॉजी समाजाची" निर्मिती झाली आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती हा इंटरनेटच्या माध्यमातून व्हाट्सअप, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम यासारखी समाज माध्यमांचा वापर दररोज करीत आहे. शिवाय दूरचित्रवाणी सारख्या दृकश्राव्य माध्यमांनी तर भारतीय जनमानसावर अधिराज्य गाजविले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे मीडियाचा सहभाग दखलपात्र ठरत आहे. 1960 च्या दशकात पत्रव्यवहार आणि वर्तमानपत्राच्या माध्यमातून नागरिकांसोबत संवाद साधला जात होता. परंतु आता मोठ्या प्रमाणात त्याची जागा समाज माध्यमांनी घेतली आहे. सोशल मीडियाचा वापर लहानांपासून तर थोरापर्यंत सर्वच जण करत आहे. त्यामुळे जनमत घडविण्यात समाज माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे.समृद्ध आणि निरोगी राष्ट्र निर्माण करण्यासाठी सर्वांनी स्वच्छतेकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. स्वच्छ भारत अभियानात लोकंना सहभागी करून स्वच्छता चळवळ उभारण्यासाठी सोशल मीडियाची भूमिका ही देशामध्ये महत्त्वपूर्ण ठरत आहे...

**निष्कर्ष :-**

1. स्वच्छ भारत अभियानाला समाज माध्यमांमुळेच गती मिळाली
2. स्वच्छ भारत अभियान प्रत्येकाच्या मनामनात आणि घराघरात राबविण्यासाठी माध्यमांची मदत झाली.
3. समाजात जाणीव जागृती निर्माण करण्याचं काम माध्यमांनी केलं

**संदर्भ**

1. महात्मा गांधी 1997 माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती नांदेड – 2
2. अण्णा हजारे 2011 'माझे गाव माझे तीर्थ' स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी राळेगाव सिद्धी
3. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील अहवाल दिनांक 27 /11/ 2017
4. डॉ सुधीर भटकर, डॉ विनोद निताळे ,डॉ गोपी सोरडे लिखित प्रसारमाध्यमे आणि समाज
5. विठूला म्हैसेकर-चव्हाण प्रसार माध्यमे भूमिका आणि कायदे
6. जयमती दळवी (अनुवादित) भारतातील प्रसार माध्यमे काल आणि आज